# पुणे शहरातील महिला खेळाडूंच्या फुटबॉल खेळातील सहभागासंबंधी प्रवाहाचा विश्लेषणात्मक अभ्यास

**अंबिका रमेश डांगे**
एम.पी.एड द्वितीय वर्ष विद्यार्थीनी, चंद्रशेखर आगाशे शारीरीक शिक्षण महाविद्यालय, पुणे
**डॉ. उज्वला राजे, डॉ. श्रद्धा नाईक**

## सारांश

*सदर संशोधनात पुणे शहरातील १४, १७, १९ वर्षाखालील आणि सिनियर गटातील महिला फुटबॉलपटूंच्या सहभागाच्या प्रवाहाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. महिला फुटबॉलपटूंच्या सहभागावर सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक आणि लिंगभेदासारख्या घटकांचा काय परिणाम होतो याचे मूल्यमापन करण्यात आले आहे. अभ्यासाची कार्यपद्धती म्हणून सर्वेक्षण, आकडेवारीचे विश्लेषण वापरण्यात आले आहे. संशोधनातून असे दिसून आले की, महिला खेळाडूंना प्रशिक्षक व आर्थिक पाठिंब्याची आवश्यकता आहे तसेच खेळासाठी समाजाकडून अधिक प्रोत्साहन मिळण्याची गरज आहे.*

***महत्वाच्या सज्ञा :*** महिला फुटबॉल, क्रीडा सहभाग, आंतरशालेय स्पर्धा, मैदानाची कमतरता, अडचणी, लिंगभेद, कौटुंबिक समर्थन, सामाजिक अडथळे, क्रीडा धोरणे, फुटबॉल प्रशिक्षण.

## प्रस्तावना

खेळ, हा क्रीडेचा सांस्कृतिक घटक म्हणून समाजाकडून स्वीकार झालेला आहे. २१ व्या शतकात शिक्षणाचे वारे वाहत असतांना आजही ग्रामीण भागातील स्त्रीया शिक्षणापासुन काही प्रमाणात वंचित आहे. भारत उपखंडामधील सामाजिक स्थितीचा विचार केला पुरुषापेक्षाही स्त्रीयांना स्वतंत्र व्यायाम करण्याची जास्त आवश्यकता आहे. क्रीडा क्षेत्रात महिला प्रशिक्षक आणि अधिकारी यांचे प्रमाण अजूनही कमी आहे संस्था थोडक्यात, महिला प्रशिक्षक बनण्याची क्षमता असलेल्या महिला खेळाडू अजून वाढलेले नाहीत. महिलांच्या खेळातील या समस्या लक्षात घेता, जपानी सेंटर फॉर रिसर्च ऑन वुमन इन स्पोर्ट हे

महिलांची खात्री करण्यासाठी संशोधनाला प्रोत्साहन देते. खेळाडू चांगल्या वातावरणात त्यांच्या ऍथलेटिक कामगिरीवर लक्ष केंद्रित करू शकतात. काही वरिष्ठ महिला खेळाडूंनी

२०१९ च्या स्पर्धेत खेळण्यास नकार दिला कारण ते त्यांच्या घरगुती संघटनांसह समान वेतनाच्या खटल्यांमध्ये गुंतले होते., . (२०१७)

ऑस्ट्रेलियाने अलीकडेच जाहीर केले की अटींमध्ये ते ऑस्ट्रेलियातील पुरुष आणि महिला आंतरराष्ट्रीय संघांमधील वेतन समान करेल. आणि या दोघांनी महिला आणि मुलींसाठी फुटबॉल खेळ वाढवण्याच्या उद्देशाने अलीकडील धोरणे प्रकाशित केली आहेत. पुरुषांच्या खेळाप्रमाणे महिला फुटबॉलला या खेळात सापेक्ष फायदा झालेला नाही आणि पुरुषांच्या तुलनेत तो देशात प्रचलित झालेला नाही. हा खेळ भारतीय महिला फुटबॉल महासंघ (WFFI) द्वारे १९७५ पासून १९९० च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत प्रशासित केला जातो. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या केंद्रीय नोंदणी प्रणालीच्या (सीआरएस) आकडेवारीनुसार, मार्च २०२४ पर्यंत भारतात २७, ९३६ नोंदणीकृत महिला फुटबॉल खेळाडू होत्या (AIFF). गेल्या २१ महिन्यांत महिला फुटबॉलपटूंची संख्या १३८% ने वाढली आहे. जून २०२२ मध्ये भारतात ११, ७२४ महिला फुटबॉल खेळाडूंची नोंदणी झाली. AIFF (2024, April 25)

या अभ्यासात पुणे शहरातील महिला खेळाडूंच्या फुटबॉल खेळातील सहभागावर परिणाम करणारे घटक तपासले जातात. क्रीडा क्षेत्रातील महिला सहभाग हा समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, आणि क्रीडाक्षेत्रात पुणे शहराला विशेष महत्त्व आहे. फुटबॉल हा पूर्वी केवळ पुरुषप्रधान समजला जाणारा खेळ आज महिलांच्याही सहभागामुळे नवे रूप धारण करत आहे. तरीही महिलांच्या फुटबॉलमधील सहभागासमोर अनेक अडचणी उभ्या राहतात. शिक्षण हा विकासाचा अविभाज्य भाग असला तरी शारीरिक शिक्षणाची जोड असल्याशिवाय महिलांचा बौध्दीक व सामाजिक विकास होऊ शकत नाही.

सदर संशोधनाचा उद्देश पुणे शहरातील आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धामधील महिला खेळाडूंच्या सहभागाचा वयोगटानुसार अभ्यास करणे आणि त्यासमोर असलेल्या अडचणींचे विश्लेषण करणे हा आहे.

सदर अभ्यासात पुणे शहरातील महिला खेळाडूंच्या फुटबॉल खेळातील सहभागावर परिणाम करणारे घटक ज्यामध्ये आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयातील महिलांना फुटबॉल खेळात येणाऱ्या लिंगभेदाच्या अडचणी, वयोगट, आव्हाने, येणारे वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक आडथळे, सहभागामध्ये शाळा, महाविद्यालय आणि कुटुंबाच्या पाठिंबा, धोरणांचा प्रभावाचा, स्पर्धेदरम्यान येणाऱ्या अडचणींचा अभ्यासाचा समावेश आहे.

## कार्यपद्धती

सदर संशोधात पुणे शहरातील महिला खेळाडूंच्या फुटबॉल खेळातील सहभागावर परिणाम करणाऱ्या घटकांचा वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. प्रस्तुत संशोधनात गेल्या वर्षी (सन २०२३) मध्ये खेळणाऱ्या विशेषत पुणे शहरातील १४ वर्षाखालील, १७वर्षाखालील, १९ वर्षाखालील आणि सीनियर या एकूण चार वयोगटातील प्रत्येक एका गटातून ३० मुलींची अशा एकूण १२० मुलींची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली. त्यातील एकूण ८३ फुटबॉल खेळणाऱ्या महिलांचा माहिती मिळाली. फुटबॉल खेळणाऱ्या महिलांना येणाऱ्या समस्या, अडचणी, त्यांचा सहभाग, लिंगभेद, पाठिंबा इ. सर्व स्थितीचा सर्वेक्षणात्मक अभ्यास केला आहे.

अनुभव, स्तर, प्रेरणा, सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, फुटबॉल प्रगतीच्या वाढीसाठी उपक्रम, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, प्रशिक्षणाचे दिवस, कुटुंबाकडून परवानगी, स्पर्धात्मक खेळासाठी कमी संधी, प्रशिक्षणा दरम्यान पुरुष खेळाडूंपेक्षा कमी दर्जाचे प्रशिक्षण या सर्व गोष्टींचा विचार करून महिला फुटबॉल खेळाडूंची माहिती प्रश्नावलीद्वारे संकलित करण्यात आली.

**माहिती संकलन**:

- फुटबॉल खेळातील मुलींचा सहभाग
- महिलांना लिंगभेदचा करावा लागणारा सामना
- फुटबॉल खेळताना मुलींना येणारे अडथळे, अडचणी, आव्हाने
- फुटबॉल मधील सुविधा, प्रशिक्षण


## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रश्नावलीद्वारे आलेले माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे,

१. तुमच्या शाळेमध्ये खालीलपैकी महिला फुटबॉल प्रगतीच्या वाढीसाठी कोणते उपक्रम घेतले जातात का?

**कोष्टक क्रमांक १.:** महिला फुटबॉल खेळाडूंच्या मते क्रीडा सहभाग वाढीसाठी उपक्रम

| **पर्याय** | **प्रतिसादङ्कांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| कार्यशाळा | १३ | ०८% |
| व्याख्याने | १२ | ०७% |
| जनजागृती मोहीम | ११ | ०७% |
| आंतरशालेय स्पर्धा | ६०% | ३६% |
| फुटबॉल स्पर्धा | ५६ | ३४% |
| वरील पैकी एकही नाही | १३ | ०८% |
| एकूण | ८३ | १०० |





**आकृती क्र. :** १ महिला फुटबॉल खेळाडूंच्या मते क्रीडा सहभाग वाढीसाठी उपक्रम

कोष्टक क्रमांक १ वरून असे आढळून आले की महिला खेळाडूंच्या प्रगतीसाठी सर्वात जास्त म्हणजेच ३६ टक्के आंतरशालेय स्पर्धा हा उपक्रम सहभागासाठी प्रभावी ठरला आहे. सर्वात जास्त आंतरशालेय स्पर्धा हा उपक्रम घेतला जातो. तसेच ३४ टक्के फुटबॉल स्पर्धा हा उपक्रम सहभागासाठी प्रभावी ठरला आहे. व सर्वात कमी म्हणजेच ७ टक्के जनजागृती मोहीम व व्याख्याने हे उपक्रम घेतले जातात. यामध्ये ८ टक्के महिला अशा आहेत की ज्यांचे एकही उपक्रम घेतले जात नाही.

**२. तुम्ही मुलगी आहात म्हणून तुम्हाला कोणत्या प्रकारच्या अडचणीचा सामना करावा लागला?**

**कोष्टक क्रमांक २ :** मुलगी असल्यामुळे क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अडचणी

| पर्याय | प्रतिसादङ्कांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| लैंगिक छळ | ३ | ०२% |
| चिडवणे | ३१ | २३% |
| आर्थिक | ११ | ०८% |
| समाजाचा दृष्टिकोन | १२ | ०९% |
| कुटुंबाकडून परवानगी | १५ | ११% |
| मैदानावर फक्त मुलेच होती | २५ | १८% |
| सुविधा | १५ | ११% |
| प्रोत्साहन / बक्षिसाची रक्कम | ८ | ०६% |
| प्रवास | १७ | १२% |
| एकूण | ८३ | १००% |




**आकृती क्र. २ :** मुलगी असल्यामुळे क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अडचणी


कोष्टक क्रमांक २ वरून असे आढळून आले की २३ टक्के महिलांना चिडवणे या अडचणीचा जास्त सामना करावा लागला. १८ टक्के महिलांना असे वाटते की मैदानावर फक्त मुलेच असल्यामुळे सराव करता येत नाही. १२ टक्के महिलांना असे वाटते की खेळाची मैदानी ही जास्त दूर असल्यामुळे प्रवास करता येत नाही. तसेच ११ टक्के महिलांना कुटुंबाकडून परवानगी आणि सुविधा या अडचणीना सामोरे जावे लागत आहे.

तसेच ६ ते ९ टक्के मध्ये महिलांना आर्थिक, समाजाचा दृष्टिकोन आणि प्रोत्साहन / बक्षिसाची रक्कम या अडचणींचा सामना करावा लागला. व २ टक्के महिलांना लैंगिक छळाचा अडचणींचा सामना करावा लागला.

**३. तुम्ही प्रशिक्षणादरम्यान कोणत्या कोणत्या आव्हानांना सामोरे गेले आहात?**

**कोष्टक क्रमांक ३ :** प्रशिक्षणादरम्यान येणारी आव्हाने

| **पर्याय** | **प्रतिसाङ्कांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| प्रशिक्षण मैदानाची कमतरता | १७ | २०% |
| उपकरणांची वाईट स्थिती | १० | ११% |
| प्रशिक्षकांची कमी | १९ | २२% |
| फिटनेस व पुनर्वसन सुविधा उपलब्ध नाहीत | २० | २३% |
| साधन सुविधांचा निकृष्ट दर्जा | १४ | १६% |
| First Aid उपलब्धता नाहीत | ७ | ०८% |
| एकूण | ८३ | १००% |




**आकृती क्र. ३ :** प्रशिक्षणादरम्यान येणारी आव्हाने

कोष्टक क्रमांक तीन वरूनअसे आढळून आले की. २३ टक्के महिलांना फिटनेस व पुनर्वसन सुविधा उपलब्ध नसल्यामुळे प्रशिक्षणादरम्यान अडचण निर्माण होत होती. तसेच २२ टक्के महिलांना प्रशिक्षकाची

कमतरता आढळून आली. २० टक्के महिलांना प्रशिक्षण मैदानाची कमतरता भासली. १६ टक्के महिलांना साधन सुविधांचा निकृष्ट दर्जा असल्यामुळे प्रशिक्षणादरम्यान अडचण निर्माण होत होती. आणि ११ टक्के महिलांना उपकरणांची वाईट स्थिती चा अनुभव आला. व ८ टक्के महिलांना फर्स्ट एड ची कमतरता आढळून आली.

## माहितीचे अर्थनिर्वचन

महिला खेळाडूंचा सहभाग शालेय स्तरावर तुलनेने चांगला आहे, परंतु महाविद्यालयीन स्तरावर तो कमी होतो. कुटुंबाचा पाठिंबा असलेल्या खेळाडूंना अधिक चांगली प्रगती करता येते. महिला खेळाडूंसाठी स्वतंत्र प्रशिक्षण सुविधा अपुऱ्या आहेत. लिंगभेद तसेच फुटबॉल पुरुषप्रधान खेळ मानला जात असल्यामुळे अनेक मुलींना खेळात प्रगती करताना अडचणी येतात. सामाजिक दबाव काही पालक आणि समाज महिला खेळाडूंना क्रीडाक्षेत्रात करिअर करण्यास प्रवृत्त करत नाहीत. आर्थिक परिस्थितीमुळे काही खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण आणि सुविधा मिळत नाहीत. आंतरशालेय स्पर्धा आणि फुटबॉल स्पर्धा जास्त प्रमाणात घेतल्या जातात. धोरणात्मक मर्यादा, शासनाच्या काही योजना,

जनजागृती मोहीम आहेत, पण त्या प्रभावीपणे राबवल्या जात नाहीत. चिडवणे अणि मैदानावर फक्त मुलेच होती त्यामुळे मुलींच्या सहभगावर परिणाम झाला. प्रशिक्षणादरम्यान महिला खेळाडूना जास्त करून या आव्हानांना सामोरे जावे लागले आहे. प्रशिक्षण मैदानाची कमतरता, प्रशिक्षकांची कमी. आणि फिटनेस व पुनर्वसन सुविधा उपलब्ध नाहीत या सर्वात जास्त खेळाडूंना महिलांना या आव्हानांना सामोरे गेले.

## निष्कर्ष

या संशोधनातून असे आढळून शकते की पुणे शहरातील महिला फुटबॉल खेळाडूंना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः मैदानावर फक्त मुलेच होती. चिडवणे, प्रशिक्षणाची कमतरता, सामाजिक आणि कौटुंबिक अडथळे, लिंगभेद, खेळासाठी असणाऱ्या मर्यादित सुविधा आणि आर्थिक अडचणी यांचा मोठा परिणाम होत आहे. शाळा आणि महाविद्यालयीन स्तरावर पुरेशा सुविधा नसल्यामुळे महिला खेळाडूंच्या संधी मर्यादित राहतात. प्रस्तुत संशोधनाच्या आधारे महिला खेळाडूंसाठी अनुकूल धोरणे, फुटबॉल स्पर्धा आखण्यासाठी प्रशासना कडून सुचना सुचवल्या जातील.

# संदर्भसूची

Goktas, Z. (2016). An investigation on the problems og college student-athletes participating in Universiade. European Journal for Sports and Socitey, 53-68. India women fall to 69th in latest FIFA rankings; USA continues as WR1. (2024, December 13). Sports Satr. Retrieved from https://sportstar.thehindu.com/football/indian-women-senior-national team-latest-fifa-ranking-afc-football news/article68981491.ece#:~:text=India%20women%20fall%20to%2069th, r ankings%3B%20USA%20continues%20as%20WR1

Sinha, S. (2022, December). Exploring the Impact of Sports Participation on the Health Aspect of Women Athletes. International Review for the Sociology of Sport.

Wangari, E. (2017). CHALLENGES FACED BY WOMAN FOOTBALL PLAYERS WHO PARTICIPATE IN FOOTBALL LEAGUES. Journal of developing Country Studies, 13-35.

Zhong, Z. (2024, March). Women Sports Participation and Gender Sensitivity Towards Enhanced Sports' Program. Journal of Education and Educational Research, 102-105.

AIFF. (2024, April 25). Retrieved from AIFF records historic rise in women footballers: https://www.the-aiff.com/article/aiff-records-historic-rise-inwomens-footballers